25-01-2025-Dai-01 (1)_DH_PAN_01_04_2016-1.qxp 01/24/2025 11:27 PM Page 1


वेर्णा कार शोरूम-सर्व्हिस सेंटरला नोटीस » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com


भारत विजयी अभियान कायम राखणार? » पान ४ वर

वेर्णा, शनिवार, २५ जानेवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 143 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 25 January, 2025 | Pages 4 | ₹ 4

# अपहरण करून तरुणीवर सामूहिक बलात्कार ..

## कासावली येथील घटनेने राज्यभरात संताप | दोन तासांत ५ नराधम गजाआड : ७ दिवसांची पोलिस कोठडी

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २४ : मानसिकदृष्ट्या कमजोर असलेल्या एका मुलीचे अपहरण करून तिच्यावर पाच नराधमांनी निर्घृणपणे सामूहिक बलात्कार केल्याची दुर्दैवी आणि संतापजनक घटना कासावली येथे घडली आहे. या पाचही नराधमांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून त्यांना सात दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली आहे. यातील चार आरोपी केवळ १८ वर्षांचे असून सर्व आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी संतप्त जनतेने केली आहे.**

२२-२३ जानेवारीच्या मध्यरात्री कासावली येथील एका फ्लॅटमध्ये पाच आरोपींनी एका मानसिकदृष्ट्या कमकुवत मुलीवर निर्घृणपणे सामूहिक बलात्कार केला. पीडितेच्या आईने फातोर्डा पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर, अनेक पथके तयार करण्यात आली आणि मोठ्या प्रमाणात शोध सुरू करण्यात आला. डिजिटल मॅपिंग आणि वैज्ञानिक तपासाद्वारे पोलिसांनी दोन तासांत पाचही आरोपींना अटक केली. अटक करण्यात आलेल्यांत आदिल अब्दुल करीम लालसाब अलगर (१८ वर्षे, विद्यामंदिर, चिखली, वास्को), मोहम्मद अली मुल्ला (२२ वर्षे, मसजीद इ फाझल मांगोरहील वास्को), शाहझाद मोहम्मद समीम शेख (१८ वर्षे, टिळक मैदानाजवळ, खारीवाडा, वास्को), विरेश अगुंडा (१८ वर्षे, गांधीनगर, हनुमंत देवस्थान, वास्को), मोहम्मद यासिर शेख (१८ वर्षे, बोगदा, वास्को यांचा समावेश आहे.

चिखली येथील आदिल अल्गुर (१८) या मुख्य आरोपीने मानसिकदृष्ट्या अस्वस्थ मुलीला भुरळ घालून मैत्री केली. मडगाव कदंब बस स्टँडवरून तिचे अपहरण केले आणि बसने वास्को बस स्टँडला



नेले. वास्को बस स्टँडवरून आदिलने पीडितेला स्कूटरवरून दाबोळी जंक्शनवर नेल्याचा आरोप आहे. त्यानंतर त्याने त्याच्या चार साथीदारांशी संपर्क साधला. हे चारही जण चारचाकी वाहनातून आले होते. त्यानंतर त्यांनी पीडितेला कासावली येथील एका फ्लॅटमध्ये नेले, जिथे आदिलने पीडितेवर बलात्कार केल्याचा आरोप आहे, त्यानंतर इतर आरोपींनी तिच्या कमकुवत मानसिक स्थितीचा फायदा घेत हे भयानक कृत्य केले.

पीडितेने तिच्या आईला ही भयानक घटना सांगितली, त्यानंतर पीडितेच्या आईने फातोर्डा पोलिसांकडे पोलिस तक्रार दाखल केली. पोलिसांनी बीएनएस कायदा २०23 च्या कलम १३८, ७0(१) आणि कलम ६४(१) (के)(एम) अंतर्गत गुन्हा दाखल केला. सर्व आरोपींना सात दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली आहे. विविध पथकांसह अनेक छापे टाकण्यात आले आणि गुन्हा करण्यासाठी वापरलेले वाहन आणि या प्रकरणाच्या पुष्टीकरणासाठी पाच मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत, असे दक्षिण पोलिस अधिक्षक सुनीता सावंत म्हणाल्या. आम्ही फिंगर प्रिंट ब्युरो आणि फॉरेन्सिक टीमच्या अधिकाऱ्यांनाही चौकशीसाठी बोलावले आहे. फातोर्डा पोलिसांकडून फ्लॅट मालकाची चौकशी केली जात आहे आणि आरोपींना गुन्हा करण्यासाठी जागा कशी देण्यात आली याबद्दल परवाने तपासले जात आहेत. आईने फातोर्डा पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर अखेर दोन तासांत प्रकरण उलगडण्यात आले, असे सावंत म्हणाल्या.

याप्रकरणी पोलीस निरीक्षक नाथन आल्मेडा, पोलिस निरीक्षक मेल्सन कुलासो, उपनिरीक्षक रियांका नाईक, पोलिस निरीक्षक अर्जुन सांगोडकर यांनी पोलीस कर्मचारी व केपे पोलिसांना घेऊन पथके बनवली आणि आरोपींच्या मुसक्या आवळल्या. याप्रकरणी सध्या फातोर्डा पोलिस अधिक तपास करीत आहेत..




## कंगनाच्या 'इमर्जन्सी'ला इंग्लंडमध्ये विरोध

**नवी दिल्ली, दि. २४ :** १९७५ मध्ये माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीवर आधारित अभिनेत्री कंगना राणावतच्या 'इमर्जन्सी' या चित्रपट प्रदर्शनास इंग्लंड मध्ये जागोजागी विरोध होत असल्यामुळे परराष्ट्र मंत्रालयाने इंग्लंडच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला आहे. भारतविरोधी घटकांकडून हिंसक निषेध आणि धमकीच्या घटनांबद्दल आम्ही युकेकडे सातत्याने चिंता व्यक्त करतो. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य निवडकपणे लागू केले जाऊ शकत नाही असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

आम्हाला आशा आहे की इंग्लंडकडून जबाबदार असलेल्यांवर योग्य कारवाई होईल करेल. लंडनमधील आमचे उच्चायुक्त आमच्या समुदायाच्या सदस्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्या संपर्कात आहे... असेही पराराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. कंगनाचा नवा 'इमर्जन्सी' हा चित्रपट वायव्य लंडनमधील एका थिएटर मध्ये सुरू असताना मुखवटा घातलेल्या खलिस्तानी दहशतवाद्यांनी धमकी देत हा चित्रपट बंद पाडल्याच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाने ही भूमिका घेतली आहे.

वुल्व्हरहॅम्प्टन, बर्मिंगहॅम आणि मँचेस्टर येथूनही अत्यंत वादग्रस्त अशा या चित्रपटाच्या प्रदर्शनात अशाच प्रकारच्या व्यत्यय आल्याचे वृत्त आले आहे . शीख प्रेस असोसिएशनसारख्या काही ब्रिटिश शीख गटांनी हा चित्रपट शीखविरोधी असल्याचे म्हटले होते त्याविरुद्ध निदर्शने आयोजित केली होती आणि त्यामुळे काही शहरांमध्ये प्रदर्शनात व्यत्यय आला. शीख संघटनांनी चित्रपटाच्या प्रदर्शनाला आक्षेप घेतल्यानंतर, भारतातील सेन्सॉरमधून जाताना कंगनाच्या 'इमर्जन्सी' चित्रपटाला प्रचंड अडचणींचा सामना करावा लागला. चित्रपटाच्या निर्मात्यांवर शीख समुदायाचे चुकीचे चित्रण करत आहेत आणि ऐतिहासिक तथ्ये विकृत करत आहेत असा आरोप शीख समुदायातल्या काही जणांकडून करण्यात येत आहे . सेन्सॉर बोर्ड आणि न्यायालयांमध्ये अनेक महिन्यांच्या वादविवादानंतर, चित्रपटाला नोव्हेंबरच्या मध्यात - तीन कट केल्यानंतर आणि काही वादग्रस्त संवादांसाठी स्त्रोत प्रदान केल्यानंतर - परवानगी देण्यात आली आणि १७ जानेवारीला हा चित्रपट प्रदर्शित झाला.

## भाजपच्या सदस्यांना पोलिसांकडून अभय ?

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २४ :** २020 मधील डबल ट्रॅकिंग विरोधी निदर्शन प्रकरणी सुरू असलेल्या पोलिस चौकशीत, कार्यकर्त्यांनी २०२० च्या निदर्शनांमध्ये सहभागी झालेल्या आमदारांविरुद्ध आरोप नसल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. कार्यकर्त्यांना कायदेशीर कारवाईचा सामना करावा लागत असताना, आता भाजपशी संलग्न असलेल्या काही सत्ताधारी आमदारांची चौकशी का केली जात नाही, असा प्रश्न या निदर्शनात सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांनी विचारला आहे.

१ व २ नोव्हेंबर २०२० रोजी, रेल्वे दुहेरी ट्रॅकिंगच्या विरोधात ५,००० हून अधिक लोक मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्यासाठी एकत्र आले. तथापि, पोलिस अधिकाऱ्यांकडून निवडक जणांवर कारवाई करण्यात येत आहे. या कारवाईतून सत्ताधारी भाजपात किंवा भाजपाला पाठिंबा देणाऱ्या सदस्यांना जाणीवपूर्वक डावलण्यात आल्याचा आरोप कार्यकर्ते करीत आहेत. तत्कालीन सरकारविरोधी आंदोलनात सहभागी झालेले आताचे भाजप सदस्य दिगंबर कामत, आलेक्स सिक्वेरा, संकल्प आमोणकर आणि आता भाजप सरकारला पाठिंबा देणारे अपक्ष आमदार आलेक्स रेजिनाल्ड यांच्यावर कोणतीही कारवाई का करण्यात आलेली नाही, असा सवाल सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे.

या प्रकरणात ज्यांचे नाव आहे, असे कार्यकर्ते विकास भगत यांनी पोलिस तपासाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. फक्त कार्यकर्त्यांनाच लक्ष्य का केले जात आहे? निदर्शनांच्या वेळी आमच्यासोबत उभे राहिलेले राजकारणी आता त्याच प्रकल्पाला चालना देणाऱ्या सरकारचा भाग आहेत. या धमक्या असूनही लोक मागे हटणार नाहीत, असे भगत म्हणाले.

पोलिसांनी अलीकडेच मूळ चौकशीतील त्रुटींचा उल्लेख करून पूरक चौकशीसाठी अर्ज दाखल केला आहे. त्यांच्या अर्जानुसार, स्टेशन डायरीतील उतारे आणि प्रमुख सरकारी अधिकाऱ्यांचे रेकॉर्ड न केलेले निवेदने तपासली गेली नाहीत, ज्यात सासष्टी संयुक्त मामलेदारांकडून माहिती घेणे महत्त्वाचे आहे असे पोलिसांनी म्हटले आहे . कार्यकर्ते अभिजित प्रभुदेसाई यांनी सरकारवर पर्यावरण आणि सार्वजनिक कल्याणाच्या खर्चावर कॉर्पोरेट हितसंबंधांसमोर झुकल्याचा आरोप केला. सरकार फक्त काही लोकांच्या आणि भावी पिढ्यांच्या लोभाला प्राधान्य देत आहे. शांततापूर्ण निदर्शकांवर खोटे खटले उलट सार्वजनिक चळवळींना बळकटी देतील, असे ते म्हणाले.

निदर्शकांनी सुरुवातीला त्यांच्या कार्याला पाठिंबा देणाऱ्या आमदारांनी केलेल्या कथित विश्वासघातावरही प्रकाश टाकला. यापैकी अनेक राजकारण्यांनी मते मिळविण्यासाठी आंदोलनाचा वापर केला परंतु निवडून आल्यानंतर निष्ठा बदलली. निदर्शनांमध्ये त्यांच्या सहभागाबद्दल त्यांना पोलिसांकडून का विचारले जात नाही? असे चांदोर निषेधात सहभागी झालेल्या पर्यावरणवादी रेनाटा फर्नांडिस यांनी विचारले.

गोंयचो एकवोट (जीई) चे संस्थापक सदस्य ऑरव्हिल डोराडो रॉड्रिग्ज यांनी सर्वोच्च न्यायालयाने कलम १९ अंतर्गत शांततापूर्ण निषेधाला घटनात्मक अधिकार म्हणून मान्यता दिल्याबद्दल सरकारच्या दृष्टिकोनाचा निषेध केला. हे सरकार भांडवलशाही हितसंबंधांमुळे लोकांविरुद्ध काम करत आहे. केंद्रीय सक्षम समितीने (सीईसी) आधीच दुहेरी ट्रॅकिंग प्रकल्पाचा त्याच्या पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांसाठी निषेध केला आहे, असे रॉड्रिग्ज म्हणाले.




## 'कोरगुट'ला 'जीआय टॅग'साठी शेतकरी सरसावले

### लोटलीतील शेतकऱ्यांची नोंदणीसाठी एक समर्पित समिती स्थापन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २४ :** खाजन जमिनी वाचवण्यासाठी प्रस्तावित उच्च-स्तरीय बोरी पुलाला विरोध करण्याचा भाग म्हणून लोटलीतील पारंपरिक शेतकऱ्यांनी आता त्यांच्या स्थानिक कोरगुट तांदळाच्या जातीसाठी भौगोलिक संकेत (जीआय टॅग ) मिळविण्याचा जोरदार प्रयत्न सुरू केला आहे. जीआय नोंदणीसाठी एक समर्पित समिती स्थापन करण्यात आली आहे, ज्यामध्ये राज्याच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंडळाचे दीपक परब यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक शेतकरी जे संतान रॉड्रिग्ज हे पुढाकार घेत आहेत. समितीमध्ये स्थानिक शेतकरी अल्बर्ट पिन्हेरो , हिपोलिटो डी'कोस्टा, जोस बी ए ग्रासियास, पॉल डिसा, व्हॅलेरियानो फर्नांडिस, गॅब्रिएल फर्नांडिस, लिओ आंद्रादे आणि मॅथ्यू ऑलिव्हिएरा यांचा समावेश आहे.

जीआय टॅगिंगचा प्रयत्न गोवा पीआरआय युनियन ॲग्रो-जैवविविधता टीमच्या व्यापक मोहिमेचा एक भाग आहे. याबाबत लोटली शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अल्बर्ट पिन्हेरो यांनी सांगितले की, कोरगुट हा तांदूळ पूर्णपणे सेंद्रिय आहे आणि खते किंवा कीटकनाशके न वापरता वाढतो. खारट पाण्यात टिकून राहण्याची त्याची उल्लेखनीय क्षमता हे त्याचे वेगळेपण आहे. पाण्यात बुडूनही हे पीक वाढत राहते आणि चांगले उत्पादन देते.त्यांनी पुढे सांगितले की तांदळाच्या तपकिरी रंगाच्या सालामध्ये औषधी गुणधर्म आहेत, ज्यामुळे ते मधुमेही रुग्णांसाठी विशेषतः फायदेशीर ठरते. इतर जातींपेक्षा त्याचे उकळते पाणी देखील सेवन केले जाऊ शकते, ज्यामुळे ते कांजी (पेज) सारख्या पदार्थांसाठी आदर्श बनते. या तांदळाला जास्त मागणी आहे, त्याची किंमत रु.८५ ते रु.९० प्रति किलो आहे.



पावसाळ्यात कोरगुट जातीची क्षारता आणि पाणी साचण्यास प्रतिकारशक्ती अत्यंत महत्त्वाची असल्याने, लोटली सारख्या किनारी प्रदेशांसाठी ते एक महत्वाचे पीक बनते. लोटलीमधील शेतकरी तांदळाचे अद्वितीय गुणधर्म राखण्यासाठी पारंपरिक शेती तंत्रांचा वापर करतात. रसायनांवर अवलंबून असलेल्या आधुनिक कृषी पद्धतींपेक्षा, कोरगुट तांदळाची नैसर्गिक लागवड जैवविविधता आणि सांस्कृतिक वारसा जपण्याची वचनबद्धता दर्शवते.जीआय टॅग मिळवल्याने तांदळाची विशिष्टता औपचारिकपणे ओळखली जाईल आणि आर्थिक शोषणासह बाह्य धोक्यांपासून त्याचे संरक्षण करण्यास मदत होईल. यामुळे प्रदेशाचा पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी पारंपरिक शेती पद्धतींचे महत्त्व देखील अधोरेखित होईल.

गेल्या दीड वर्षांहून अधिक काळ लोटली आणि बोरी येथील शेतकरी या पुलाला विरोध करत आहेत, कारण या प्रकल्पामुळे त्यांच्या शेतांचा नाश होण्याची आणि परिसंस्थेला अडथळा येण्याची त्यांना भीती आहे .शेतकरी २१ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (एनजीटी) च्या सुनावणीसाठी सक्रियपणे तयारी करत आहेत, तसेच त्यांच्या जमिनींचे संरक्षण करण्यासाठी उच्च न्यायालयात जाण्याची योजना आखत आहेत.